पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३४९५ दि.२३/११/२०१९**

## विमानतळ पोलिस स्टेशन पुणे शहर

## हस्तीदंताची तस्करी करणारे गुन्हेगार विमानतळ पोलीसांचे जाळयात

दिनांक २२/११/२०१९ रोजी ए.डी.पिंगळे पोलीस उप निरीक्षक विमानतळ पोलीस ठाणे पुणे हे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे कार्यालयात हजर असताना त्यांना गोपनिय बातमीदारां मार्फत बातमी मिळाली की, हस्तीदंताची विक्री करण्यासाठी काही इसम साकोरेनगर रोडवर विमाननगर पुणे येथे येणार आहेत.

सदरची बातमी मिळाल्याने विमानतळ पोलीस ठाणेकडील तपास पथकाने साकोरेनगर रोडवर विमाननगर पुणे येथे सापळा रचुन इसम नामे १) याहीया अहमद खान, वय ४२ वर्षे, रा. कोपरखैरने,वाशी नवी मुंबई, २) अभय अरविंद जोशी वय ५५ रा. लोटस अपार्टमेन्ट नविन नेरुळ पश्चिम नवी मुंबई यांना दिनांक २२/११/२०१९ रोजी १६/४० वा वनरक्षक अधिकारी सो, यांचे मदतीने पकडुन त्यांचे कडुन हत्ती या प्राण्याचे दोन दात, एक टाटा टिगोर, फोर व्हिलर कार,एक एच.टी.सी.कंपनीचा मोबाईल फोन, दोन सॅमसंग कंपनीचे मोबाईल फोन एक रंगीबेरंगी कापडी पिशवी व डॉल्फिन कंपनीचे पैसे मोजण्याचे मशिन असा एकुण ४५,३७,०५०/- (पंचेचाळीस लाख सदोतीस हजार पन्नास रुपये ) किमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री. सुनिल फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, मा. श्री. प्रसाद अक्कानवरु, पोलीस उपायुक्त परि.- ०४ पुणे शहर, श्री देसाई, सहा.पोलीस आयुक्त, येरवडा विभाग पुणे शहर, यांचे आदेशावरुन श्री गजानन पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर व श्री बळवंत मांडगे पोलीस निरीक्षक गुन्हे विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे ए.डी.पिंगळे पोलीस उप निरीक्षक, पोलीस कर्मचारी अविनाष शेवाळे, अशोक आटोळे, अजय खराडे, विशाल गाडे, विश्वनाथ गोणे, राहुल मोरे, संजय आढारी, नाना कर्चे, प्रशांत कापुरे, विनोद महाजन यांचे पथकाने केली आहे.


विमानतळ पोलीस स्टेशन
रामवाडी, पुणे -१४.
फोन नं.०२०-२६६३३८८८